साप्ताहिक
# परळी परिसर
* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# परळीत 'नाद' करायचाच नाही!

**गेल्या विधानसभेच्या (२०१९) निवडणुकीत तीस हजार ७०० एवढे मताधिक्य घेऊन विधानसभेत परळी वैजनाथ मतदार संघातून निवडून गेलेले आमदार धनंजय मुंडे यांनी या विधानसभेच्या निवडणुकीत गेल्या निवडणुकीतील मताधिक्याच्या पाचपट मताधिक्य घेऊन नवा इतिहास रचला आहे. या निवडणुकीत विरोधकांचा 'मराठा कार्ड' चा प्रयोग पुन्हा फसला असून परळीत 'नाद' करायचाच नाही...! असा इशारा या निवडणुकीने दिला आहे.**



गेली तीन दशके परळीच्या मातीत राजकारण व समाज कार्यात सक्रीय असलेल्या आमदार धनंजय मुंडे यांच्या विरोधात महाविकास आघाडीने या विधानसभा निवडणुकीत नवखा व मतदार संघाबाहेरील उमेदवार देऊन घोडचूक केली ही भावना या निवडणुकीच्या सुरुवातीपासून व निवडणूक झाल्यानंतरही महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षातील नेते व कार्यकर्त्यांची होती. शिवाय ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मानणाऱ्या समर्थकांचाही असाच सुर होता. परळी मतदार संघातील सगे-सोयरे, मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील यांचे वादळ आपल्याला या निवडणुकीत परळीतून यशस्वी करेल या भरोशावर कॉंग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी या निवडणुकीची तयारी केली. परळीत संपर्क वाढवण्याबरोबरच मराठा आरक्षण आंदोलनात सहभाग वाढवला. परळीतून उमेदवारी मिळवण्यासाठी फिल्डींग लावली. मोठी शक्ती लाऊन कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देत राष्ट्रवादीच्या तिकिटावर परळीतून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीने श्री देशमुख यांना उमेदवारी दिल्यानंतर आघाडीतर्फे इच्छूक असलेले इथले नेते मोठे नाराज झाले. इथेच श्री देशमुख यांचा पहिला पराभव झाला. नाराज नेते व इतर महत्वाच्या कार्यकर्त्यांची समजूतही काढली गेली. परंतु उपयोग झाला नाही. उसने अवसान आणून या नेत्यांनी निवडणुकीत काम केले. शरद पवार यांच्या सभेत आणि कागदावरच डरकाळ्या फोडणाऱ्या अनेक नेत्यांच्या गावात, वार्डात या नाराजीमुळेच श्री देशमुख यांच्या तुतारीला फारशी साथ मिळाली नाही.

मतदार संघात ओळख नसणे, इथल्या राजकारण व विकास प्रश्नांत कोणताही सहभाग नसणे, जनतेच्या प्रश्नासाठी कोणताच संघर्ष केला नाही की कार्यकर्त्यांचे पुरेसे बळ नाही. प्रचाराचे नियोजनही नाही, मिडियाची फारशी साथ नाही. मतदारापर्यंत जाऊन आपल्या भावना मांडायला पुरेसा वेळही नाही, परळीच्या विकासासाठी व इथल्या जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी जाहीरनामा नाही की निवडणुकीचा वचननामा नाही, निवडणूक लढवण्यासाठी लागणारी पैशाची ताकत नाही, मतदानावेळी व मतदानादरम्यान उभी करावी लागणारी यंत्रणा नाही, मतदान केंद्रावर मतदान करवून घेण्यासाठी कार्यकर्त्यांचा फौजफाटा नाही, या निवडणुकीची म्हणावी तशी तयारी नाही, परळीची श्री पवार व घाटनांदूरची खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांची सभा वगळता इतर ठिकाणी प्रचारसभा नाहीत की प्रचार रॅल्या नाहीत. श्री मनोज जरांगे यांच्या वादळाची व मराठा समाजाचीही फारशी साथ नाही. खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांचीही म्हणावी तेवढी साथ मिळाली नाही. या व अशा अनेक कारणामुळे या निवडणुकीत नुसतीच हवा केलेल्या तुतारीचा मोठा आवाज घुमलाच नाही. असे असले तरी प्रतिकूल परिस्थिती असूनही श्री देशमुख यांनी व महाविकास आघाडीच्या येथील नेते व कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत लढत दिली, हे ही नसे थोडके..!

मतदानानंतर श्री देशमुख यांना आमदार धनंजय मुंडे यांच्या तुलनेत पावभरच मते मिळाली. मतदार संघातील आठ गावात तर भोपळा व ४७ मतदान केंद्रावर दहा पेक्षा कमी मते पडली. मग श्री देशमुख यांनी कोणत्या बळावर ही निवडणूक लढवली व महाविकास आघाडीने त्यांना कोणत्या बळावर उमेदवारी दिली? असा सवाल आता इथे उपस्थित होतो आहे. जातीच्या बळावर येथून यश मिळवण्याचा ज्येष्ठ नेते बाबुराव

निवडणूक विश्लेषण वार्तापत्र
**लक्ष्मण वाकडे**
पत्रकार, परळी वैजनाथ.

आडसकर यांच्या नंतरचा हा 'मराठा कार्ड' चा प्रयोग पुन्हा फसला आहे. विशेष म्हणजे मराठा समाज बहूल असलेल्या गावात 'घडी'ला लक्षणीय मतदान पडले आहे. हा समाज जाती पेक्षा विकासाला साथ देतो हे या समाजाने या निवडणुकीतून पुन्हा दाखून दिले आहे. महाविकास आघाडीने या निवडणुकीत प्रचारात परळीतील दहशत, गुंडगिरीचे, भांडवल केले परंतु हे मुद्दे मतदानावर फारसा प्रभाव दाखवू शकले नाहीत. तसेच मतदानादिवशी महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते ॲड.माधव जाधव यांना झालेली मारहाण, अनेक मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचा आरोप, कार्यकर्तेच मतदान करत असल्याची ओरड हे मुद्देही मतदानावर कोणतेच परिणाम करु शकले नाहीत.

परळीच्या राजकारणात आपली तीस वर्षे घातलेल्या आमदार धनंजय मुंडे यांना परळीत निवडणूक लढवायची कशी व निवडणुकीत यश मिळवायचे कसे याचा मोठा अनुभव आहे. इथल्या जनतेची नाडी ओळखलेल्या श्री मुंडे यांनी या निवडणुकीची गेल्या अनेक दिवसांपासून मोठी तयारी केली. लोकसभेत महायुतीचा झालेल्या पराभवाचा धडा घेऊन मोठ्या जोमाने ते कामाला लागले. श्री मुंडे यांना मतदार संघात गुंतून ठेवण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नाने तर ते मोठ्या ताकतीनिशी मैदानात उतरले. मतदार संघात गेल्या दहा पंधरा वर्षात केलेली विकास कामे यापुढे करणार असलेली विकासकामे, सामाजिक कामे याचा जाहीरनामा परळीच्या जनतेपुढे मांडत समाजातील आठरा पगड जातीची मते आपल्या पारड्यात टाकून घेण्यासाठी त्यांनी लावलेली फिल्डींग, दलित, मुस्लिम समाजाची मिळवलेली ताकद, मराठा, लमाणी, धनगर, समाजाची मते मिळवण्यासाठी केलेले मोठे प्रयत्न, महायुतीतील भाजपसह इतर विविध पक्षातील नेते, कार्यकर्त्यांचे बळ, निवडणुकीचे, प्रचाराचे उत्तम नियोजन, समर्थक, नेते, कार्यकर्ते यांना विविध जबाबदाऱ्या सोपवून टाईट केलेली फिल्डींग, ज्येष्ठ नेत्या पंकजाताईंची मिळालेली साथ याचा मोठा फायदा श्री मुंडे यांना झाला. विरोधकांनी केलेले आरोप, टिका याकडे दुर्लक्ष करत आपले घोडे श्री मुंडे दामटीतच राहिले. त्यातच या निवडणुकीत 'आपला माणूस, हक्काचा माणूस' म्हणून वंजारी समाजाची मिळालेली मोठी भक्कम साथ श्री मुंडे यांची ताकत वाढवतच गेली. मतदानादिवशी घाटनांदूर व परिसरातील घटनेने महायुतीची सहानुभूती वाढवली. ओबीसींच्या मताचा मोठा गठ्ठाही श्री मुंडे यांच्या पारड्यातच पडला.

परळीतून यशस्वी होण्यासाठी ज्येष्ठ नेते वाल्मिकअण्णा कराड व इतर शेकडो नेते, कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस घेतलेली मेहनत, मतदान दिवशी व मतदाना दरम्यान उभी केलेली यंत्रणा, मतदान करुन घेण्यासाठी कामाला लावलेले कार्यकर्ते, 'वन बूथ पाच-पन्नास युथ' असे राबवलेले धोरण, कोणत्याच गोष्टीची कमतरता भासू न देण्यासाठी व जे जे करता येईल ते ते करण्यासाठी केलेले प्रयत्न. मुंबई, पुणे, औरंगाबाद यांसह इतर ठिकाणी रोजगार व शिक्षणासाठी गेलेल्या परळीकरांना मतदानाला येण्यासाठी घातलेली साद, साखर कारखान्यावर उसतोडणीसाठी जाणाऱ्या कामगारांना मतदान करुन जाण्याचे केलेले आवाहन, मतदार संघातील गाव, वाडी, वस्ती, तांड्यासह शेवटच्या माणसांपर्यंत केलेला संपर्क, कार्यकर्त्यांनीच हातात घेतलेली निवडणूक, वंजारी समाज बहूल असलेल्या अनेक गावात श्री मुंडे यांना ९५ ते १०० टक्के मतदान झाले. या समाजाने गावातील इतर समाजाचे मतदानही घडीला करून घेतले हे विशेष. अशा अनेक कारणांमुळे या निवडणुकीत श्री मुंडे यांच्यावर परळीकरांच्या मतांचा धो-धो पाऊस पडला. मोठ्या नेत्यांच्या सभा नाही की प्रचाराच्या सांगतेचे मोठ शक्तीप्रदर्शनही नाही असे असूनही मतांचा महापूर आला! या पुरात विरोधकांची 'तुतारी' तग धरु शकली नाही. या मतदार संघाच्या इतिहासात प्रथमच एक लाख चाळीस हजार एवढे मताधिक्य व दोन लाखाच्या घरात मते मिळवणारे धनंजय मुंडे पहिले आमदार ठरले आहेत. या निवडणुकीत मोठा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला आहे. या निवडणुकीतील मोठ्या यशाने आमदार धनंजय मुंडे यांचा बीड जिल्ह्यासह राज्याच्या राजकारणात प्रभाव वाढला आहे. या त्सुनामीच्या लाटेत आमदार धनंजय मुंडे यांचा बालेकिल्ला अधिक भक्कम झाला आहे. परळीकरांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी श्री मुंडे यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना आता अधिक जोमाने काम करावे लागणार आहे. परळी विधानसभा मतदार संघात या निवडणुकीत महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांना ५४ हजार ६६५ एवढी मते पडली आहेत. त्यांना मतदान करणाऱ्यांसाठी व मतांचा टक्का वाढविण्यासाठी श्री देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांना आत्मपरिक्षण करुन परळीत पुढील काळात अधिक परिश्रम घ्यावे लागणार आहेत. ***

# विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मोठे यश

परळी वैजनाथ, (बातमीदार):- सबंध देशात गाजलेल्या व विविध राजकीय पक्षाने आपली प्रतिष्ठापणाला लावलेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) व इतर मित्र पक्षाच्या महायुतीला मोठे व अभूतपुर्व यश मिळाले आहे. महायुतीला एकूण २३६ जागा मिळाल्या असून महाविकास आघाडीला केवळ ४९ जागा मिळाल्या आहेत.

महाविकास आघाडीतील एकाही पक्षाला पुरेशा जागा मिळाल्या नसल्याने विधानसभेत विरोधी पक्षनेते पदाची खुर्ची रिकामी असणार आहे असे महाराष्ट्रात प्रथमच घडत आहे.

या निवडणुकीत महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपने सर्वाधिक म्हणजे १४९ जागा लढऊन १३२ जागा जिंकल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ८१ जागा लढऊन ५७







तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला ५९ जागा लढऊन ४१ जागा जिंकल्या आहेत. महायुतीचे संख्याबळ २३६ एवढे झाले आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या या मोठ्या यशाने युतीतील सर्वच घटक पक्षाचे नेते, कार्यकर्ते उत्साहित झाले आहेत. 'लाडकी बहीण' या सारख्या लोकाभिमुख योजना सरकारने राबवल्यामुळे युतीला महाराष्ट्रात यश मिळाले, अशी भावना ते व्यक्त करत आहेत. 'विधानसभेच्या या निकालामुळे विकसित भारताच्या संकल्पाला महाराष्ट्राने मजबूत केले आहे', या शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निकालानंतर प्रतिक्रिया दिली आहे. या निवडणुकीत जो विखारी प्रचार झाला त्याला महाराष्ट्रातील जनतेने आपल्या कृतीतून उत्तर दिले आहे, विरोधकांचे हे चक्रव्यूह आम्ही भेदले आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जनतेने ही निवडणूक आपल्या हातात घेतली, मताच्या रुपाने महायुतीवर प्रेमाचा वर्षाव केला, बहीण, भाऊ, शेतकरी अशा सर्वच घटकांनी महायुतीवर प्रेम दाखवले या शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निकालानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्य सरकारने विविध योजना जाहीर केल्या, त्या लोकप्रिया झाल्या. त्यात 'लाडकी बहीण' योजना गेमचेंजर ठरली असे उपमुख्यमंत्री अजित पवार या निकालाबाबत म्हणाले.

दरम्यान या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा धक्का महाराष्ट्रातील जनतेने दिला आहे. या आघाडीतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने ९५ जागा लढऊन २० तर १०१ जागा लढऊन १६ तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने ८६ जागा लढऊन केवळ दहा जागा जिंकल्या आहेत. आघाडीतील घटक पक्षाचे अनेक मोठे या निवडणुकीत नेते पराभूत झाले आहेत. यामुळे महाविकास आघाडी राज्यात बॅकफूटवर गेली आहे. ***

## परळीच्या निवडणुकीत 'पिपाणी' तिसऱ्या स्थानी

परळी वैजनाथ, (बातमीदार):-

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ही खरोखरच एकतर्फी अशा प्रकारची निवडणूक झाली. या निवडणुकीत निर्विवादपणाने महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी एकहाती भक्कम विजय मिळवला. गेल्या लोकसभेत बीड लोकसभा मतदारसंघात पिपाणी निवडणूक चिन्ह असलेल्या उमेदवाराने मोठी हवा केली होती. लोकसभेच्या निवडणुकीत तब्बल ५०,००० च्या वर मते 'पिपाणी' या चिन्हाने घेतली होती. परळी विधानसभा निवडणुकीतही 'पिपाणी' हे चिन्ह अधोरेखित झाले असुन सर्वाधिक मते घेणाऱ्या एक व दोन क्रमांका नंतर पिपाणी चिन्ह असलेल्या उमेदवाराने तिसरा क्रमांक मिळवलेला आहे. वास्तविक पाहता खूप मोठ्या प्रमाणावर मते मिळाली नसली तरी अन्य उमेदवारांच्या तुलनेत साहस पंढरीनाथ आदोडे या उमेदवाराने उल्लेखनीय अडीच हजार मते घेतलेली दिसुन येत आहेत.

परळी विधानसभा मतदार

### 'पिपाणी'मुळे कुठे-कुठे बसला फटका

| मतदारसंघ | शरद पवार गटाचे उमेदवार | मतांनी पराभव | ट्रम्पेटला मते | विजयी उमेदवार (पक्ष) |
|---|---|---|---|---|
| जिंतूर (परभणी) | विजय भांबळे | ४,५१६ | ७,४३० | मेघना बोर्डिकर (भाजप) |
| घनसावंगी (जालना) | राजेश टोपे | २,३०९ | ४,८३० | हिकमत उढाण (शिंदेसेना) |
| शहापूर (ठाणे) | पांडुरंग बरोरा | १,६७२ | ३,८९२ | दौलत दरोडा (अ.प.गट) |
| बेलापूर (ठाणे) | संदीप नाईक | ३७७ | २८६० | मंदा म्हात्रे (भाजप) |
| अणुशक्तीनगर (मुंबई) | फाहद अहमद | ३,३७८ | ४,०७५ | सना मलिक (अ.प.गट) |
| आंबेगाव (पुणे) | देवदत्त निकम | १,५२३ | २,९६५ | दिलीप वळसे पाटील (अ.प.गट) |
| पारनेर (अहिल्यानगर) | राणी लंके | १,५२६ | ३,५८२ | काशीनाथ दाते (अ.प.गट) |
| केज (बीड) | पृथ्वीराज साठे | २,६८७ | ३,५५९ | नमीता मुंदडा (भाजप) |
| परांडा (धाराशिव) | राहुल मोटे | १५०९ | ४४४६ | तानाजी सावंत (शिंदेसेना) |

संघामधून दोन पत्रकार उमेदवारांनी निवडणूक लढवली. यामध्ये विकास इंडिया पार्टीकडून भागवत बबनराव वैद्य तर साहस पंढरीनाथ आदोडे यांनी मराठवाडा मुक्ती मोर्चाकडून उमेदवारी केली. त्यांना या निवडणुकीत 'पिपाणी' हे चिन्ह मिळाले. त्यांनी या निवडणुकीत मुख्य दोन लढतीतील उमेदवार धनंजय मुंडे व राजेसाहेब देशमुख यांच्या नंतरची सर्वाधिक २५७३ इतकी मते मिळवली आहेत. त्यामुळे परळी मतदारसंघाच्या विधानसभा निवडणुकीतही 'पिपाणी' हे चिन्ह अधोरेखित झाले असुन सर्वाधिक मते घेणाऱ्या एक व दोन क्रमांका नंतर 'पिपाणी' चिन्ह असलेल्या उमेदवाराने तिसरा क्रमांक मिळवलेला आहे. तर दुसरे पत्रकार उमेदवार भागवत बबनराव वैद्य यांना १४३ इतकी मते मिळाली आहेत.राजेसाहेब देशमुख हेच नाव साधर्म्य असलेल्या राजेसाहेब उर्फ राजाभाऊ सुभाष देशमुख यांना २३५ मते मिळाली आहेत.तर मतदाना आधी एक दिवस धनंजय मुंडे यांना जाहीर पाठिंबा दिलेल्या अपक्ष उमेदवार सय्यद हिदायत यांना ४८५ इतकी मते मिळवली आहेत. ***

## बीड जिल्ह्यात महायुतीची सरशी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- विधानसभेच्या या निवडणुकीत महाराष्ट्रात मोठे यश मिळवणाऱ्या महायुतीने बीड जिल्ह्यातही आघाडी घेतली आहे. परळीतून मोठे मताधिक्य घेवून आमदार धनंजय मुंडे विजयी झाले आहेत तर माजलगाव मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) चे विद्यमान आमदार ज्येष्ठ नेते प्रकाशदादा सोळंके, केज विधानसभा मतदार संघातून भाजपच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा, आष्टीमधून याच पक्षाचे आमदार सुरेश धस तर गेवराई मधून राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) चे विजयसिंह पंडित विजयी झाले आहेत. चुरशीच्या झालेल्या बीड विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार व राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) चे उमेदवार संदीपभैय्या क्षीरसागर दुसऱ्यांदा विजयी झाले आहेत. दरम्यान परळीच्या शेजारी असलेल्या गंगाखेडमधून रासपचे विद्यमाने आमदार रत्नाकरराव गुट्टे, पाथरीतून राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) चे राजेश विटेकर, लातूरमधून कॉंग्रेसचे अमितभैय्या देशमुख यांनी बाजी मारली आहे. मराठवाड्यात महायुतीला ४६ पैकी ४१ तर महाविकास आघाडीला केवळ पाच जागा मिळाल्या आहेत. **

## बॅडमिंटन स्पर्धेतील यशाबद्दल सुनील पवार यांचा श्री इंगळे यांच्या हस्ते सत्कार




परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वीज निर्मिती केंद्राचा देश पातळीवर डंका वाजत असून गुजरात येथील वडोदरा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विद्युत कंपन्यांच्या अखिल भारतीय बॅडमिंटन स्पर्धेत महाजनकोचे प्रतिनिधित्व करताना परळी औष्णिक विद्युत केंद्राचे सुनील पवार यांनी कास्यपदक पटकावले आहे.

गुजरात येथील वडोदरा येथे नुकत्याच अखिल भारतीय विद्युत कंपनीच्या बॅडमिंटन स्पर्धेत महाजनकोचे प्रतिनिधित्व करताना परळी औष्णिक विद्युत केंद्राने देशभरातून तिसरा क्रमांक मिळवून कांस्यपदक पटकावले. यापूर्वी २०००- २००१ मध्ये रजत पदक पटकावले होते. त्यानंतर २३ वर्षांनी कास्यपदक मिळाले आहे.

याबरोबरच बुद्धिबळ स्पर्धेत राघव देशपांडे यांनी रजत पद्धत पटकावले तसेच शमिमा शेख यांनीही बुद्धिबळ स्पर्धेत सहभाग नोंदविला. सुनील पवार यांनी आतापर्यंत क्रिकेट, टेबल टेनिस, बॅडमिंटन या तिन्ही खेळात अखिल भारतीय विद्युत कंपनीच्या स्पर्धेत नेतृत्व केले आहे. या यशाबद्दल व्यवस्थापक सुनिल पवार यांचे परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनिल इंगळे, अधीक्षक अभियंता प्रसन्नकुमार गरुड , धनंजय कोकाटे , संभाजी बुक्तरे, राजीव रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे,सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड आदींनी अभिनंदन केले आहे. ***

## महाविकास आघाडीला सहकार्य करणाऱ्यांचे ज्येष्ठ नेते बहादूरभाई यांनी मानले आभार

परळी (प्रतिनिधी):- महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील सर्वच पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह मतदार बंधू- भगिनींनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले. याबद्दल प्रत्येकाचे आभार कॉंग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादूर भाई यांनी मानले आहेत.

परळी विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ही कशा पद्धतीने लढली गेली. निवडणुकीत



काय काय प्रकार झाले? हे आपणा सर्वांना माहिती आहे. तरीही आपण आपल्या जीवाची पर्वा न करता लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न केले. २३३- परळी विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया सर्वांच्या सहकार्यामुळे पार पडली. अनेक मतदार बंधू-भगिनींनी एक सजग मतदार म्हणून मतदानाचा हक्क बजावला आणि लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न केले. सहकार्याबद्दल आणि जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडल्याबद्दल या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार कॉंग्रेसचे परळी शहराध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई यांनी मानले आहेत.

संपादकीय...

# शेत कामाचा खोळंबा..!

**✲ सुविचार ✲**
आयुष्यात कोणतीच गोष्ट कधीही कायमची नसते, एक तर तिचा काळ संपून जातो किंवा आपली वेळ संपून जाते

खरीप पिकाची काढणी, रब्बी हंगामाची तयारी, पुन्हा पेरणी, अगोदर दिवाळी, नंतर विधानसभेच्या निवडणुका या चारही गोष्टी एकाच वेळी आल्याने ग्रामीण भागात, शेत शिवारात शेतकऱ्यांची मोठी धांदल उडाली. त्याला कारण होते शेत कामासाठी मिळत नसलेले शेतमजूर.!

शासनाकडून रेशनवर मिळणारे मोफत धान्य, लाडकी बहीण यासारख्या योजनेतून मिळणारे पैसे तसेच इतर योजनातून मिळणारे लाभ. यामुळे शेत शिवारात थंडी, वाऱ्यात, मातीत, चिखला, पाण्यात राबण्यासाठी वाटेल तेवढे पैसे देऊनही शेतकऱ्यांना मजूर मिळत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. त्यातच यंदा दिवाळी व त्यानंतर निवडणुका या दोन्ही गोष्टी एका मागून एक आल्याने शेतीच्या कामावर परिणाम झाला आहे. सोयाबीनची काढणी, रब्बीसाठी शेतजमीनीची पूर्व मशागत, कापसाची वेचणी ही कामे करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतमजूर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकरी, त्यांचे कुटुंबीय शेतात राबत आहेत. अनेक शेतकऱ्यांची मुले आपल्या शाळा, कॉलेज बुडवून कापसाची वेचणी करताना दिसत आहेत. शेत काम करणारे मजूर निवडणुकीच्या कामात गुंतल्याने जागोजाग मजूरांची टंचाई निर्माण झाली असल्याचे दिसते.

विधानसभेच्या निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवारांना गावात, वार्डात गल्लीत प्रचार फेरी काढण्यासाठी कार्यकर्ते तसेच प्रचार फेरी भव्य दिव्य झाल्याचे दाखवण्यासाठी फेरीत माणसे लागतात. मग ही माणसे पाचशे रुपयांपासून हजार रूपये रोज देऊन आणली जातात. प्रचार सभेची गर्दी वाढण्यासाठी अशीच रक्कम देऊन माणसे गोळा केले जातात. कष्टाचे काम न करता सहज इकून तिकडे केले की हजार-पाचशे मिळत असल्याने शेतावर राबणारे शेत मजूर निवडणुकीच्या कामाला जात गेल्याने दिवाळीपासून ग्रामीण भागात शेतकामासाठी मजूरांची टंचाई जाणवते आहे. शेत कामासाठी मजूर मिळावेत म्हणून शेतकरी मजुरांच्या घरीदारी जातो आहे. परंतु मजूर यायला तयार नाहीत. कापूस काढणीला आला आहे. तो वेळीच नाही काढला तर त्याच्या वजनात घट होते म्हणून लवकर कापसाची वेचणी करण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांचा आहे. कापूस वेचणीसाठी दहा, पंधरा ते वीस रूपये किलो एवढा भाव देऊनही मजूर मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

शेतकामासाठी असलेली मजूरांची टंचाई, फुकट पैसे मिळत असल्याने, काम न करण्याची वाढलेली प्रवृत्ती, रेशनवर मिळणारे फुकटचे व कमी पैशातील धान्य यामुळे शेतात काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत त्यातच शेतीचा उत्पादन खर्च वाढल्याने व बाजारात शेतमालाला भाव नसल्याने शेतीच्या बाबतीत शेतकरी मेटाकुटीला आला आहे. 'शेतकरी होण्यापेक्षा शेतमजूर झालेले बरे!' अशी भावना अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत. त्यातच निवडणुकीचा पैसा आल्याने शेतात कामासाठी अनेक ठिकाणी मजूर यायला तयार नसल्याने शेत कामाचा खोळंबा झाला आहे. शेतमजूरांची शेतकामासाठी होत असलेली टंचाई शेतकऱ्यांपुढे मोठे दुखणे होऊन बसले आहे. कष्टाचे काम करायला व शेतात राबायला नको वाटत असल्याने ग्रामीण भागात नवी समस्या निर्माण झाली आहे. शेतात काम करण्यासाठी मजूरांच्या टंचाईचे मोठे आव्हान सध्या शेतकऱ्यांपुढे आहे. ✲✲✲

# हा बदल नक्की केव्हा झाला..?

वीस पंचवीस वर्षांपूर्वी नोकरी करणारा मुलगा पगार निमूटपणे वडिलांच्या हातात देत होता.! मग वडील त्यातून घरातला काही खर्च करायचे, थोडी बचत केली जायची आणि मुलाला येण्याजाण्याच्या तिकीटापुरते आणि दिवसाला फार तर एक चहा पिता येईल इतके पैसे दिले जात होते.

आता मुलाला पगार किती मिळतो हे विचारायला आई-वडील कचरतात. मुलगा त्या पैशाचे काय करतो हे विचारायची हिम्मत/इच्छा आई-वडिलांकडे नसते...!

हा बदल केव्हा झाला....? कॉलेजमध्ये जाताना साडी ऐवजी पंजाबी ड्रेस घालायला मिळतो याचा आनंद मानणारी मुलगी आता तिच्या मुलीला हाफ पॅन्टमध्ये फिरताना बघते.

मनातल्या मनात चरफडते पण स्पष्टपणे मुलीला ''अंगभर कपडे घाल'' असे म्हणायची हिंमत करत नाही....! हा बदल केव्हा झाला....? वयात आलेली मुलगी संध्याकाळच्या आत घरात असायची, घरकामात मदत करायची. आता एकदा स्वयंपाक घरात येऊन खायला काय आहे ते बघते आणि स्वतःच्या खोलीत जाऊन परस्पर ऑर्डर करून खाणं मागवते. हा बदल केव्हा झाला......? लग्नाअगोदर मुला-मुलीने एक-दोन वेळा भेटणे म्हणजे पुढारलेपण मानणारे आता नातवंडांचे लिव इन रिलेशनशिप स्वीकारतात. हा बदल केव्हा झाला.....? वर्षातून एकदा होळीच्या वेळी मोठ्या लोकांपासून लपून भांग पिण्याचा कार्यक्रम ठरवणारी आता प्रौढ झालेली माणसं घरातल्या तरुण मुलंपुढे सहज ग्लास भरु लागली. हा बदल कधी झाला....?

नातवंडांना जवळ घेणारी, नातीच्या केसांना तेल लावून देणारी, गोष्टी सांगणारी आजी, आता सकाळी योगा क्लास नाहीतर लाफ्टर क्लासला जाते आणि नातवंडांशी टीव्हीच्या रिमोटसाठी भांडते. हा बदल केव्हा झाला.....?


घरातल्या कोणाशी बोलत नाहीत अशांना कौन्सिलर जवळचा वाटतो. त्याला पैसे देऊन त्याचा सल्ला मानतात. पण स्वतःच्या भावंडांवर विश्वास ठेवायला तयार नसतात.

तोच प्रकार पैशाच्या व्यवहाराबद्दल. नवरा-बायको दोघेही कमावतात. पण कुठे खर्च झाले, किती गुंतवले, कुठे गुंतवले, ते फक्त सीएला माहित असते. मुलीच्या संसारातले सगळे लहानसहान तपशील जाणून घेणारे आई-वडील, मुलगा आणि सुनेच्या बाबतीत मात्र अलिप्त राहतात. असं का होतंय.....?

वडीलधा-यांचा मान ठेवणा-यांच्या मुली नवऱ्याचा येता-जाता अपमान करतात, सगळ्यांसमोर उणं-दुणं काढतात. अशा वेळी मुलीचे आई-वडील कसनुसं हसतात आणि मुलाचे आई-वडील हतबुद्ध होतात. हा बदल कधी झाला.......? तरुण मुले एक नोकरी सोडतात, दुसरी धरतात. राहत्या गावातून दुसऱ्या गावी जातात. सगळे ठरल्यावर आई-वडिलांना फक्त सांगितलं जातं. त्याच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या गोष्टींमध्ये तर आई-वडिलांना सांगण्याचीही गरज नसते. मित्रांबरोबर ट्रीपला जाणे, ब्रेकअप होणे, सिनेमाला जाणे, पार्टी करणे, स्वतःसाठी नवीन वस्तू, फोन, कपडे वगैरे खरेदी करणे, अशा गोष्टीत आई-वडिलांनी दखल दिलेली मुलांना आवडतं नाही. असं का होतं..? हा बदल कधी झाला.......? नातेवाईकां कडे जाणं, शेजार्यांकडे वेळप्रसंगी जाणं, लग्न समारंभात सहभागी होणं, कुळाचार पाळणे, देवळात जाणे, पूजा करणे, इत्यादी गोष्टींवर आता काही घरात नाराजी नाही. तर भांडणे होतात. असं का होतं..? हा बदल कधी झाला..? मान्य आहे, दोन पिढ्यांमध्ये अंतर असतेच. पाचवारी नेसणाऱ्या सुनेबद्दल नऊवारी नेसणाऱ्या सासूने तेव्हाही नाराजी व्यक्त केली होती. पण आता पन्नाशी पार केलेल्या पिढीत आणि त्यांच्या मुलांच्या पिढीत अंतर नाही दरी निर्माण झाली असं वाटतं. हा बदल नक्की केव्हा झाला...? खरंच विचार करायला हवा.

**-विकास शहा**

# शांतपणे सामोरे जा...




***मान अपमान गोवे ।***
***अवघे गुंडूनी ठेवावे ।।***
***हें चि देवाचें दर्शन ।***
***सदा राहे समाधान ।।***

जगद्गुरु संत तुकोबा म्हणतात, माणुस दररोजच्या वागण्यात 'मी' पणाच्या खुपच आहारी जातो. मान, सन्मान या चक्रव्युहात अडकून पडतो आणि जीवनात पुढे पडण्याच्या प्रक्रियेला यामुळे अडथळा निर्माण होतो.

सार्वजनिक ठिकांणी मान मिळावा, तिथं आपल्याला सन्मानित करावं, यासाठी बरेचजण अतिशय लाचारी करत असतात. जर मान-सन्मान नाही भेटला तर तो अपमान समजून ती लोकं उगाचच त्रागा करतात. 'अहंकार' जपणाऱ्या या असल्या 'मान अपमानाच्या' गोष्टीला दूर ठेवलं पाहिजे.

ज्या गोष्टीमुळे मन निर्मळ, समाधानी रहाते, अंतःकरण शुद्ध राहते, ते काम सतत करत राहिल्याससाक्षात परमेश्वरच आपल्याला दर्शन देतो...! फक्त ते ओळखता आलं पाहिजे. त्याला भेटण्यासाठी कुठेही जायची गरज नाही.

एखादा खुप वेळ पूजापाठ करतो, देव-देव करतो, तिर्थक्षेत्री जातो, पण हे सगळं करत असताना जर त्याच्या मनात अहंकार असेल, इतरांच्या विषयी द्वेष असेल, तिरस्कार असेल, तर त्याला ईश्वर कसा भेटणार? फक्त दिखावा करण्याचे ढोंग करत असतात त्यामुळे त्या भक्तीला अर्थ प्राप्त होत नाही. ज्या व्यक्तिकडे संयम आहे, शांतपणे विचार करण्याची ताकद आहे अशासमोर साक्षात 'काळ' सुध्दा थांबतो. म्हणुन संत तुकाराम महाराज म्हणतात,' ज्या व्यक्तीकडे अहंकार नाही, अपमान, स्तुती आणि निंदा या गोष्टीला शांतपणे सामोरे जातो तोच व्यक्ती यशस्वी होतो.

**- संग्राहक : शाहूराज येवते,**
परळी वैजनाथ.

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# एक लाख ४० हजाराच्या विक्रमी मताधिक्याने धनंजय मुंडे परळीतून विजयी

## महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांना मिळाली ५४ हजार ६६५ एवढी मते

**परळी वैजनाथ, (एस.एल.वाकडे):- सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या परळी विधानसभा (२३३) निवडणुकीत ज्येष्ठ नेते अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार, विद्यमान आमदार व पालकमंत्री धनंजय मुंडे विक्रमी म्हणजे एक लाख चाळीस हजाराचे मताधिक्य घेऊन या मतदार संघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. या निवडणुकीत त्यांच्या विरोधात लढणारे ज्येष्ठ नेते शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांचा मोठा पराभव झाला आहे.**

या निवडणुकीत येथे एकूण अकरा उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी बहुतेक उमेदवारांना अत्यल्प मते मिळाल्याने त्यांच्या अनामत रकमा जप्त झाल्या आहेत. या निवडणुकीत विजयी झालेले आमदार धनंजय मुंडे यांना एक लाख ९४ हजार ८८९ मते पडली आहेत तर राजेसाहेब देशमुख यांना ५४ हजार ६६५ मते मिळाली. श्री मुंडे एक लाख चाळीस हजाराच्या मताधिक्याने येथून विजयी झाले. एवढे मताधिक्य व मते मिळवणारे मतदार संघातील ते पहिले उमेदवार ठरले आहेत. शिवाय या निवडणुकीत मराठवाड्यात सर्वाधिक मते व मताधिक्य श्री मुंडे यांनाच आहे.

या निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदार संघातील एकूण तीन लाख ३८ हजार ४४१ मतदारांपैकी दोन लाख ५५ हजार ६३८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मताची टक्केवारी ७५.२७% एवढी होती. गेल्या बुधवारी (ता.२०) या निवडणुकीसाठी मतदान झाले होते. परळी शहरातील उर्जानगर वसाहतीतील नवीन सांस्कृतिक भवनाच्या सभागृहात शनिवारी (ता.२३) मतमोजणी झाली. सकाळी आठच्या सुमारास सुरू झालेल्या या मतमोजणीसाठी १४ टेबल व मतमोजणीच्या २६ फेऱ्या होत्या. मतमोजणी केंद्राच्या परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



पहिल्या फेरीपासूनच धनंजय मुंडे यांना मताची आघाडी मिळत गेली. ही आघाडी अखेरपर्यंत कमी झालीच नाही, ती वाढतच गेली. निकालाचे चित्र स्पष्ट होऊ लागल्याने निकाल ऐकण्यासाठी मतमोजणी केंद्राच्या परिसरात उभ्या असलेल्या श्री मुंडे यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी जल्लोष करायला सुरवात केली तर इकडे परळी शहर व परिसरात 'येऊन येऊन येणार कोण..धनंजय मुंडे शिवाय दुसरे कोण?' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत फटाक्यांची आतषबाजी करायला सुरुवात केली. परळी मतदार संघात कार्यकर्ते, समर्थक पुन्हा जल्लोषात दिवाळी साजरी करु लागले. काहींनी तर श्री मुंडे यांच्या अभिनंदनाचे मोठ-मोठे बॅनर परळी शहरात व मतदार संघात निकाल जाहीर होण्याच्या अगोदरच लावले होते.

दुपारनंतर निकालाचे चित्र स्पष्ट होताच सबंध परळी मतदार संघात होणाऱ्या फटाक्याच्या दणदणाटाने परिसर दणाणून गेला. रात्री उशिरापर्यंत फटाक्यांची आतषबाजी सुरू होती. निकाल जाहीर झाल्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी मतमोजणी केंद्राच्या परिसरात मोठा जल्लोष केला. गुलालाची उधळण व जयघोष करत डीजेच्या निनादात श्री मुंडे यांची उघड्या कार मधून मिरवणूक काढण्यात आली. कारमध्ये उभे राहून श्री मुंडे यांनी कार्यकर्ते, परळीकरांचे स्वागत, अभिनंदन स्वीकारत हात जोडून त्यांना अभिवादन केले. मिरवणूक मार्गावर जागोजाग नागरिक व कार्यकर्त्यांनी श्री मुंडे यांचे स्वागत केले. दरम्यान निवासस्थानी श्री मुंडे यांचे औक्षण करुन उपस्थितांनी जल्लोषात स्वागत केले. यावेळी पत्नी राजश्रीताई यांच्यासह त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

दरम्यान, मतमोजणी केंद्रावर मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, तेजस्विनी जाधव, नायब तहसीलदार बी.एल.रुपनर, पालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थित श्री मुंडे यांना निवडणुकीतील विजयाचे प्रमाणपत्र दिले. या अधिकाऱ्यांनीच ही निवडणूक व मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यासाठी उत्तम नियोजन करुन मोठे परिश्रम घेतले. दरम्यान, या निकालानंतर विविध माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना धनंजय मुंडे यांनी निवडणुकीत मोठे यश दिल्याबद्दल परळीकरांचे आभार मानले. ***

**परळी विधानसभेच्या निवडणुकीनंतर मोठा विजय मिळविल्यानंतर श्री मुंडे मुंबईत दाखल झाल्यानंतर पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ आदींनी अभिनंदन व कौतुक केले. महायुतीच्या नव्या सरकारमध्ये श्री मुंडे यांना कोणते खाते मिळते याची येथे उत्सुकता आहे.**

### परळी विधानसभा मतदार संघ निवडणूक २०२४

| | | | |
|---|---|---|---|
| १) | धनंजय पंडितराव मुंडे | राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) | १९४८८९ |
| २) | धोंडीराम लक्ष्मण उजगरे | बहुजन समाज पार्टी | १०६४ |
| ३) | राजेसाहेब श्रीकिसन देशमुख | राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) | ५४६६५ |
| ४) | केदारनाथ वैजनाथ जाधव | पी.अँड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया | ३४० |
| ५) | भागवत बबनराव वैद्य | विकास इंडिया पार्टी | १४३ |
| ६) | साहस पंढरीनाथ आदोडे | मराठवाडा मुक्ती मोर्चा | २५७३ |
| ७) | अल्ताफ खाजामिया सय्यद | अपक्ष | २४८ |
| ८) | दयानंद नारायण लांडगे | अपक्ष | ८१६ |
| ९) | राजेसाहेब सुभाष देशमुख | अपक्ष | २३५ |
| १०) | शाकेर अहेमद शेख | अपक्ष | १८० |
| ११) | हिदायत सादेकअली सय्यद | अपक्ष | ४८५ |

एकूण मतदार - ३३८४४१ झालेले मतदान - २५५६३८
मतदान टक्केवारी - ७५.२७% नोटा - ९१२ बाद मते - ११

# परळी विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांना आठ मतदान केंद्रावर केवळ शून्य मते!

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संपूर्ण महाराष्ट्रातील बहुचर्चित परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघ मुंडे परिवाराचा निर्विवाद बालेकिल्ला असल्याचे मतदानातील आकडेवारीवरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. 'मोठा चमत्कार करणार' असे शरद पवार यांच्या बाबतीत या मतदारसंघातील निवडणुकी संदर्भात म्हटले जायचे. मात्र शरद पवारांच्या पक्षाला परळी मतदारसंघातील मतदान केंद्रावर शून्य मते मिळाली आहेत. तर अनेक ठिकाणी या पक्षाच्या उमेदवाराला दोन आकडी मतेही मिळवता आलेली नाहीत.

धनंजय मुंडे यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार असलेल्या राजेसाहेब देशमुख प्रचाराच्या सुरुवातीपासूनच पिछाडीवर पडले होते. निवडणूक यंत्रणा राबवण्यात आणि कार्यकर्त्यांचा संच सक्रिय करण्यात त्यांना शेवटपर्यंतही यश आले नाही. त्यामुळे निवडणूक प्रचार काळातच ही निवडणूक संपूर्णतः एकतर्फी होईल असे चित्र झाले. शेवटपर्यंतही शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना प्रचार व मतदारसंघातील जनसंपर्कात आपला प्रभाव निर्माण करता आला नाही.या सर्व परिस्थितीचा परिणाम निवडणूक निकालावर स्पष्ट झाला. परळी मतदार संघातील ३६३ मतदान केंद्रापैकी बहादुरवाडी, भोजनकवाडी, धर्मापुरीचे तीन , कुसळवाडी, जिरेवाडी व भोपळा या ८ मतदान केंद्रावर राजेसाहेब देशमुख यांना ० मतदान मिळाले आहे तर ४७ मतदान केंद्रात त्यांना ९ च्या आतच मतदान पडल्याचे दिसून येत आहे.

या निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी मताधिक्य मिळविण्याचा इतिहास रचला आहे. त्यांनी १,९४,८८९ एवढी मते घेत तब्बल १ लाख ४० हजार २२४ मतांचे मताधिक्य घेत विरोधकांचा सुपडा साफ केला. मतदार संघात असलेल्या ३६३ मतदान केंद्रापैकी ८ केंद्रावर प्रमुख विरोधक असलेल्या राजेसाहेब देशमुख यांना भोपळा देखील फोडता आला नाही तर ४७ ठिकाणी एक आकडी मतदानावर समाधान मानण्याची नामुष्की ओढवली.

परळी मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक ९७ मोहा येथे सर्वाधिक २१ मतदारांनी नोटा चा वापर केला, त्या पाठोपाठ गिरवली बावणे १३, कासारवाडी १२, बर्दापूर ११, जवळगाव १०, तर पोस्टल मतदान करणाऱ्या ७ मतदारांनी नोटा चा वापर केला.मतदार संघात एकूण ९१२ मतदारांनी नोटा चा वापर यावेळो मतदार संघात केला.

दरम्यान, विधानसभा निवडणूकीत राजेसाहेब देशमुख यांना शून्य मतदान पडलेले मतदान केंद्र: बहादूरवाडी, भोजनकवाडी, धर्मापुरीतील तीन मतदान केंद्र, कुसळवाडी, जिरेवाडीतील एक मतदानकेंद्र, व भोपळा ही आहेत. ***